**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:22.07.2024** **वार:सोमवार**

---

**ठळक बातम्या..**

•संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरूवात
•आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीला विजयी करण्यासाठी तयारीला लागा - ज्येष्ठ भाजपा नेते अमित शहा यांचं पक्ष कार्यकर्त्यांना आवाहन
•अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर सर्व यंत्रणांनी सतर्क राहण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश आणि
•महिलांच्या आशिया चषक टी- ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत भारताचा संयुक्त अरब अमिरातीवर 78 धावांनी विजय

**अर्थसंकल्पीय अधिवेशन**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून सुरू होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन संसदेत आज आर्थिक पाहणी अहवाल सादर करतील आणि उद्या त्या लोकसभेत 2024-25 या वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतील. या अधिवेशनात सरकार सहा नवीन विधेयकं मांडण्याची शक्यता आहे.अधिवेशनापूर्वी सरकारनं काल बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सरकारनं सर्व राजकीय पक्षांकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

**अमित शहा**

भारतीय जनता पार्टी हा विचारधारेला अनुसरून काम करणारा पक्ष आहे; महान भारताची उभारणी भाजपाकडूनच होईल आणि आगामी काही दशकं देशात भाजपाचंच सरकार असेल, असं ठाम प्रतिपादन ज्येष्ठ भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी काल पुण्यात केलं. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं काल भाजपाचं महाअधिवेशन झालं; या अधिवेशनाच्या समारोपाच्या सत्रात शहा यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. लोकसभा निवडणुकांच्या काळात विरोधकांनी खोटा प्रचार केला; तो खोडून काढा, आत्मविश्वास जागृत करा, भाजपाच्या ज्येष्ठ, जुन्या-जाणत्या नेत्यांचे विचार समोर ठेवा, आपापसातील मतभेद दूर करा आणि एकजूट होऊन

विधानसभेच्या निवडणुकीमध्ये काम करा असा आदेश त्यांनी पक्ष कार्यकर्त्यांना दिला.महाराष्ट्रात जेव्हा भाजपाप्रणीत सरकार येतं तेव्हा मराठा समाजाला आरक्षण मिळतं आणि जेव्हा इतर सरकारं येतात तेव्हा ते आरक्षण काढून घेतलं जातं, अशी टीका त्यांनी केली. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्यात महायुतीचं सरकार येणं गरजेचं आहे असं सांगून आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीला पूर्ण बहुमत मिळेल असा विश्वास शहा यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघाती टीका केली. विधानसभा निवडणुकीत भाजपाला 2014 पेक्षा जास्त मोठं यश मिळवून देण्यासाठी सज्ज व्हा असं आवाहन त्यांनी पक्ष कार्यकर्त्यांना केलं. यावेळी आपल्या भाषणात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात केंद्र सरकारनं राबवलेल्या विविध योजनांचा उल्लेख केला.तत्पूर्वी या अधिवेशनात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध नेत्यांनी आपले विचार मांडले. आगामी विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचंच सरकार येईल असा विश्वास फडणवीस यांनीही व्यक्त केला. मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याबाबत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी आपली मतं स्पष्ट करावीत असं ते म्हणाले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही सकाळच्या सत्रात पक्ष कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, पक्षाचे राज्यातील नेते गिरीश महाजन, आशिष शेलार, पंकजा मुंडे यांच्यासह, भाजपाचे 5 हजारापेक्षा जास्त कार्यकर्ते आणि पदाधिकारी या अधिवेशनात सहभागी झाले होते.

**अजित पवार**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा कार्यकर्ता निर्धार मेळावा काल पिंपरी चिंचवड इथं झाला. पक्षाध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित या मेळाव्यात जनसेवेप्रती आपल्या बांधीलकीचा पुनरुच्चार करण्यात आला.

**अतिवृष्टी**

मुंबईसह कोकणातल्या काही जिल्ह्यांमध्ये आणि राज्यातल्या अन्य भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्यानं दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती प्रतिसाद दल, जिल्हा प्रशासन, पोलीस तसंच स्थानिक स्वराज्य संस्थांनी सतर्क राहावं आणि नागरिकांना सर्वतोपरी मदत करावी असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. सर्व यंत्रणांनी हवामान खात्याकडून तसंच आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून परिस्थितीची वेळोवेळी माहिती घ्यावी आणि त्यानुसार नियोजन करावं अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. पूरग्रस्त क्षेत्रात अन्नधान्य, औषधं आणि आवश्यक साहित्य तसंच पर्यायी निवारास्थानं उपलब्ध करून ठेवावीत. जनावरांच्या स्थलांतराचीही व्यवस्था तयार ठेवावी, अशा विविध सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

**पाऊस**

राज्याच्या विविध भागात काल मुसळधार पाऊस पडला. कोकणात जनजीवन विस्कळीत झालं आहे. रायगड जिल्ह्यात महाडमध्ये सावित्री  नदी आणि रोह्यात कुंडलिका नदी धोक्याच्या पातळीवरुन वाहात आहेत. तसंच आंबा, पाताळगंगा आणि जिल्ह्यातील अन्य नद्यांनाही पूर आले आहेत. महाड, माणगाव, पोलादपूर आणि कर्जत तालुक्यातील सर्व शाळांना सुटी जाहीर करण्यात आली आहे.रत्नागिरी जिल्ह्यात खेड तालुक्यातली जगबुडी नदी धोका पातळीच्या वरून वाहत आहे. लांज्यात आंजणारी इथं काजळी नदी धोका पातळीच्या जवळ आहे. राजापुरातली कोदवली, संगमेश्वरातली शास्त्री आणि लांज्यातली मुचकुंदी या नद्याही इशारा पातळीच्या वरून वाहत आहेत. रत्नागिरी तालुक्यात सोमेश्वर आणि टेंभ्ये या गावांमध्ये भातशेती पाण्याखाली गेली आहे. मलकापूरमध्ये पाणी भरल्यानं रत्नागिरी-कोल्हापूर मार्गावरची वाहतूक आंबा घाटाऐवजी अणुस्कुरा घाटातून वळवण्यात आली.सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी तालुक्यात तेरेखोल नदी आणि कणकवली तालुक्यात वाघोटन नदी इशारा पातळीच्या वरून वाहू लागली आहे. नदी काठच्या लोकांना प्रशासनानं सतर्कतेचा इशारा दिला आहे. अनेक मार्ग पाण्याखाली गेल्यानं वाहतूक ठप्प झाल्यामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुंबई आणि उपनगरांत काल मुसळधार पावसानं अनेक ठिकाणी पाणी साचून वाहतूक कोंडी झाली. नवी मुंबईत बेलापूर इथल्या एका डोंगरावर अडकलेल्या 60हून अधिक पर्यटकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आलं; तसंच नेरूळ एमआयडीसी इथं अडकलेल्या एका नागरिकालाही सुरक्षित बाहेर काढण्यात आलं आहे. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातही जोरदार पाऊस सुरू आहे.यवतमाळ जिल्ह्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाणी साचलं आहे; जिल्ह्यातले अनेक मार्ग बंद झाले असून घरांचं आणि शेतीचं नुकसान झालं आहे. नागपूरमध्ये शनिवारी झालेल्या अतिवृष्टीमुळे वेगवेगळ्या घटनेत तीन व्यक्ती पाण्यात वाहून गेल्या. त्यातील दोघांचे मृतदेह सापडले; एकाचा शोध सुरू आहे.गडचिरोली जिल्ह्यात आज मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे; त्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी जिल्ह्यातील शाळांना सुटी जाहीर करण्यात आली आहे.

**गुरुपौर्णिमा**

गुरुपौर्णिमेनिमित्त काल राज्यात सर्वत्र अनेक धार्मिक कार्यक्रमांचं  आयोजन  करण्यात  आलं होतं. शिर्डीच्या साईबाबा मंदिरात, शेगावच्या संत श्री गजानन महाराजांच्या मंदिरात तसंच अक्कलकोट इथल्या श्री स्वामी समर्थ मंदीरात काल भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. पुण्यातल्या सोमवार पेठेतल्या श्री त्रिशुंड गणपती मंदिराचं तळघर काल दिवसभर मुक्त ठेवण्यात आलं होतं. राज्यात अनेक ठिकाणी सामाजिक उपक्रमही आयोजित करण्यात आले होते.

**दूध परिषद**

दुधाला हमीभाव मिळावा यासाठी सरकारविरोधात शेतक-यांनी संघटित होवून लढा दिला पाहिजे, असं आवाहन दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीचे समन्वयक आणि अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय सहसचिव अजित नवले यांनी केलं. ते काल पुण्यात आयोजित दूध परिषदेत बोलत होते. सरकारनं  दुधाला प्रतिलिटर 30 रूपये दर द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली.

**क्रिकेट**

महिलांच्या आशिया चषक टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत भारतानं काल संयुक्त  अरब  अमिराती संघावर 78 धावांनी विजय मिळवला. श्रीलंकेतील डंबुला इथं झालेल्या या सामन्यात भारतानं निर्धारित 20 षटकात 5 खेळाडू गमावत 201 धावा केल्या. कर्णधार हरमनप्रीत कौरच्या 66 धावा आणि यष्टीरक्षक रिचा घोषच्या नाबाद 64 धावा हे भारतीय  संघाच्या फलंदाजीचं वैशिष्ट्य ठरलं. यूएईला 7 खेळाडूंच्या बदल्यात केवळ 123 धावा करता आल्या. भारतीय संघानं या स्पर्धेत दोन सामने जिंकून 4 गुणांसह आघाडी घेतली आहे.

**हवामान**

कोकण,मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात आज अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मराठवाड्यात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिकपत्र बातमी संपलं, नमस्कार.**